# आपला हात हिच खरी पत्रिका



अंगठा:- अंगठ्याची महिती सर्वच शास्त्रज्ञांनी वर्णीली आहे. एका शास्त्रज्ञाने असे लिहिले आहे की, हाताच्या योगाने मनुष्याने आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले तर अंगठ्या मुळे कर्तबगार पुरुषाला मनुष्यामध्ये अग्रेसरत्व प्राप्त झाले.

चेहऱ्यामध्ये जसे नाकाला महत्व तसे हस्त सामुद्रिक शास्त्रात अंगठ्याला महत्व आहे. अंगठा हा कर्तबगारीचा द्योतक आहे. अंगठा सोडून बाकीच्या चारही बोटांना प्रत्येकी तीन पेरी असतात. परंतु अंगठ्याला दोनच पेरी असतात. अंगठा लांब, सरळ, मांसल व उजव्या बाजूला झुकलेला, समान पेऱ्यांचा व मृदु असा असला तरी ते शुभलक्षण समजावे. लहान, वाकडा, चपटा, रूक्ष कठीण व खडबडीत असल्यास वाईट समजावा.

अंगठ्यावरून विचारशक्ती, इच्छाशक्ती विवेक व कर्तृत्व समजते. पहिले पेरे मोठे व जाड असेल तर त्या व्यक्तिच्या इच्छा जबरदस्त असतात तो फार महत्वाकांक्षी असतो. पहिले पेरे लहान असेल तर उतावळ्या स्वभावाचा आपल्या योग्यतेची जाणीव नसलेला व अविचारी आणि उच्छृंखल असा असू शकतो. दुसरे पेरे मोठे व पुष्ट असेल तर त्याची विचारशक्ती व विवेक उत्तम असतो.

आखुड अंगठा असणारा मनुष्य विश्वासार्ह नसतो. त्याच्यावर विश्वास ठेवणे योग्य नसते. त्याची वागणुक सभ्यपणाची नसते.

अंगठ्याच्या पहिल्या व दुसऱ्या पेरामध्ये चिन्ह यश देते. यव चिन्ह हे अंगठ्यावर असणे फार महत्वाचे व भाग्योदय कारक आहे. मागील बाजूस वाकणाऱ्या अंगठ्याचा मनुष्य अचळ पचळ व बडबड्या असतो.

अंगठ्याचे तिसरे पेरे म्हणजे शुक्र उंचवटा होय. हा चैनी वृत्तीचा कारक आहे. अंगठ्याची पहिली व दुसरी पेरी चांगली उत्तशीत असली तर तळहातावरील वाईट रेषे पासून भीती बाळगण्याचे कारण नाही म्हणून अंगठा जास्त महत्वाचा आहे. दुसऱ्या पेऱ्यावर शुभ चिन्हे असतील तर तो मनुष्य यशस्वी असतो त्याचा उत्कर्षकाळ उत्तरार्धात असतो.

महाभारतातील एकलव्याची गोष्ट वाचली म्हणजे अंगठ्यामध्ये काय सामर्थ्य आहे हे लक्षात येते. त्याचा गुरु दक्षिणेसाठी अंगठा जाताच सर्व कौशल्य, श्रम व सामर्थ्य ही वाया गेले.

नुकतेच जन्मलेले बालक ते आपल्या इच्छाशक्तीचा उपयोग करु लागेपर्यंत त्याच्या मुठीच्या आत अंगठा व इतर बोटे असतात. फिट्स किंवा अपस्माराचा पेशंट मृत्युच्या वेळी आपले अंगठे बहुधा मुठीच्या आत झाकुन घेतात.

अंगठा हा मानवी अंतःकरणाला, विचारशक्ती जागृत आहे की नाही हे दाखविण्याची निशाणीच आहे कारण मनुष्य विचार करु लागला की त्याचा अंगठा नॉर्मल असतो. या उलट तो रागवला असता त्याची शक्ती नष्ट होते व तो दुसऱ्याला मारण्यासाठी मुठी वळु लागतो. तेव्हा बोटांच्या आत अंगठा घेऊन ठोसा लगावण्याची त्याची तयारी झालेली दृष्टिस पडते. विचारशक्ती नष्ट झाली की अंगठा बोटांच्या आत, व ती जागृत झाली की तो बोटांच्या बाहेर सापडतो हे यावरुन सिद्ध होते.

स्त्रियांमध्ये साधारणपणे मोठ्या अंगठ्यांच्या व लहान अंगठ्याच्या असे दोन प्रकार दिसतात. मोठ्या अंगठ्याची स्त्री चतूर शहाणी व बुद्धिमान असते तसेच स्तुतिप्रिय व मत्सरी होनसर्व परंतु लहान अंगठा असल्यास ती मत्सरी व चंचल असते. दुसऱ्या वाईट चिन्हांची जोड मिळाल्यास वागणुक वाईट अनिश्चित, चिडचिड व ऐकी असते तिच्याजवळ काहिही गुप्त रहात नाही. अंतःकरणात प्रेम कमी व विषय विकार असु शकतो.

अंगठ्यावर जास्त रेषा असणे हे संपत्तिदर्शक आहे. पहिल्या पेऱ्यावर पूर्वार्धात व दुसऱ्या पेऱ्यावर उत्तरार्धात या रेषा सांपत्तिक सौख्य देतात. अशा प्रकारे अंगठा आपल्या शरीराच्या अतिशय महत्वाचा भाग आहे असे म्हणता येईल.

ॐकार हस्तरेषातज्ञ
मो. ९५४५३४३०००

ओंकार हस्तरेषातज्ञ
एका महिन्यात ज्योतिष शिका .
हस्तरेषा, अंकशास्त्र, वास्तुशास्त्र,
मानसिकता सहीत फक्त अचूक
समजून घ्या. आपल्या अनेक
प्रश्नांची उत्तरे आपल्याच हातात.
हि सांकेतिक भाषा आपण शिकायला
हवी. दुर्मिळ भाग हुशार असे ...
३० वर्षांचा प्रदिर्घ अनुभव

मो. 9545343000
7875343000
www.omkarpalmist.in